नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
यश सिद्धि न्यूज
संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ४ थे Year - 4rd | अंक - १७० Issue - 170 | वार - मंगळवार दि. १७ नोव्हेंबर २०२६ Blow- Tuesday Date 17 NOVEMBER 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

दिवंगत अजित पवार ग्रामीण विकास व सहकार क्षेत्रातील ज्ञानकोष आणि नव्या नेतृत्वासाठी विद्यापीठ : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

पुणे जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराचे लोकनेते अजितदादा पवार नामकरण व पुतळ्याचे अनावरण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पुणे : दूध संघ, प्राथमिक कृषी पतसंस्था, साखर कारखाने, नागरी सहकारी बँका आणि जिल्हा सहकारी बँकांच्या कामकाजाची इत्थंभूत माहिती असलेले अजितदादा हे ग्रामीण विकास व सहकार क्षेत्राचे चालते-बोलते ज्ञानकोश होते आणि त्याची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे, अशा शब्दांत केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या कार्याचा गौरव केला.

पुणे जिल्हा परिषदेच्या यशवंतराव चव्हाण सभागृहात उभारण्यात आलेल्या लोकनेते अजितदादा पवार यांच्या अर्धाकृती पुतळ्याचे अनावरण केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. तसेच जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला 'अजितदादा पवार प्रवेशद्वार' असे नामकरण करण्यात आले. त्यानंतर नेहरू मेमोरियल हॉल येथे आयोजित कार्यक्रमात शाह बोलत होते.

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, गृह राज्यमंत्री योगेश कदम, विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष वीरधवल जगदाळे, खासदार सुप्रिया सुळे, पार्थ पवार, माजी मंत्री दिलीप वळसे पाटील, रवींद्र चव्हाण, ग्रामविकास विभागाचे सचिव चंद्रकांत पुलकुंडवार, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आदी उपस्थित होते.

अजितदादांच्या कार्याचे स्मरण करताना केंद्रीय गृहमंत्री शाह म्हणाले, अजितदादा अखेरपर्यंत पुणे जिल्हा, बारामती आणि पिंपरी-चिंचवडच्या प्रश्नांसाठी आग्रही होते. सर्वोच्च पदावर पोहोचल्यानंतरही जमिनीशी नाळ जोडून ठेवणारे आणि सामान्य माणसाच्या प्रश्नांशी बांधिलकी जपणारे त्यांच्यासारखे नेतृत्व दुर्मीळ असते. साखर कारखान्यांवरील प्राप्तिकराचा प्रश्न सोडविण्यासाठी अजितदादांनी सातत्याने पाठपुरावा केला. एखाद्या प्रश्नाचे महत्व ओळखून त्याचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. कोविडच्या संकटकाळातील त्यांच्या कार्यतत्परता आणि नागरिकांना वैद्यकीय सुविधा मिळण्यासाठी त्यांनी केलेला पाठपुराव्यातून लोकांच्या प्रश्नांप्रती असलेली त्यांची आस्था आणि जबाबदारीची जाणीव दिसून येते.



बारामतीच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान होते. बारामतीला देशातील सर्वाधिक विकसित मतदारसंघांपैकी एक बनविण्यात त्यांचा मोठा वाटा आहे. लोकदरबाराच्या माध्यमातूनच जनतेच्या अडचणी समजतात आणि सामान्य नागरिकाला कधीही भेटता आले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. विकासासाठीचे नियोजन, सातत्य आणि चिकाटीने उद्दिष्ट साध्य करण्याची त्यांची कार्यपद्धती अनुकरणीय होती, असेही शाह म्हणाले. अजितदादांची कार्यपद्धती ही नव्या पिढीतील राजकीय नेतृत्वासाठी एका विद्यापीठाप्रमाणे आहे. लोकांशी संवेदनशीलतेने वागणे, कामाचे नियोजन, शिस्त आणि निश्चित वेळेत काम पूर्ण करण्याची त्यांची हातोटी नव्या पिढीने आत्मसात करावी, असे आवाहनही त्यांनी केले.

जिल्हा परिषदेच्या प्रवेशद्वाराला अजितदादांचे नाव देणे आणि यशवंतराव चव्हाण यांच्या पुतळ्याशेजारी त्यांचा अर्धाकृती पुतळा उभारणे ही समाधानाची बाब आहे. या माध्यमातून पुढील पिढ्यांना त्यांच्या कार्याची ओळख होऊन प्रेरणा मिळेल, असेही शाह यांनी नमूद केले.

अजितदादांची शिस्त, निर्णयक्षमता आणि कामाचा ठसा प्रेरणादायी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

अजितदादांच्या आठवणींना उजाळा देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, ते कणखर, शिस्तप्रिय, प्रशासनावर पकड असलेले आणि दूरदृष्टीचे नेतृत्व होते. पुणे जिल्हा परिषदेच्या कामकाजाला दिशा देण्यात त्यांचे मोठे योगदान होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा परिषदेचे नवे नेतृत्व उभे राहिले. ज्या जिल्हा परिषदेच्या माध्यमातून त्यांनी पुण्याच्या ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न केले त्या पुणे जिल्हा परिषदेने त्यांच्या स्मरणार्थ पुतळा उभारणे आणि प्रवेशद्वाराला त्यांचे नाव देणे हा त्यांच्या कार्याचा उचित गौरव आहे, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अजितदादांच्या स्पष्टवक्तेपणाचा उल्लेख करताना मुख्यमंत्री म्हणाले, एखादी गोष्ट पटली तर ते ठामपणे तिच्या पाठीशी उभे राहत आणि न पटलेली गोष्ट स्पष्टपणे नाकारत. वित्तमंत्री म्हणून अनेक अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी कठीण परिस्थितीतही आर्थिक शिस्त कायम राखली. विकासकामांमध्ये निधीचा योग्य विनियोग, कामांची गुणवत्ता आणि अपेक्षित परिणाम यावर त्यांचा विशेष आग्रह असायचा. सकाळी सहा वाजता कामासाठी तयार होऊन सात वाजल्यापासून कामकाजाला सुरुवात करण्याची त्यांची (पान २ वर...)

राज्यभरात थंडी वाढली; पुण्यात सर्वात कमी तापमानाची नोंद

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

मुंबई : संपूर्ण राज्यात सध्या हवामानाचा लपंडाव सुरू आहे. एकीकडे 'गोड गुलाबी थंडी'ची सुखद चाहूल लागली असताना उत्तरेकडून थंड वारे खाली महाराष्ट्राच्या दिशेनं सरकत आहेत. तर दुसरीकडे पश्चिम बंगालच्या खाडीत कमी दाबाचा पट्टा तयार झाला आहे. सोबतच बंगालच्या उपसागरात तयार होत असलेल्या 'अकबन' चक्रीवादळाचा परिणाम आता राज्यातील हवामानातही जाणवतो आहे.

एकीकडे महाराष्ट्रातील बहुतांश जिल्ह्याच्या किमान तापमानात घट होत असतानाचे चित्र असताना, हवामान विभागाने १९ नोव्हेंबरच्या आसपास विदर्भात पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. तर राज्यात पुढील ५ दिवस पावसाचा अंदाज नसला, तरी चक्रीवादळाच्या दिशेनुसार हवामानात बदल होऊ शकतो, असा अंदाज आहे. दरम्यान राज्यात कोणत्या जिल्ह्यात हवामानाची एकंदरीत परिस्थिती काय, हे जाणून घेऊ. राज्यात पुणे येथे राज्यातील सर्वात कमी १२.१ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली आहे. तर तिकडे, नाशिकर देखील थंडीने गारठले असून नाशकात तापमान १२.६ अंशावर पोहचले आहे. यंदा रविवारी हंगामातील आतापर्यंतच्या निचांकी १२.६ अंश सेल्सिअस किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे.

तर उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांच्या प्रवाहामुळे देखील वातावरणात गारवा जाणवत आहे. दरम्यान, केवळ थंडी वाढली नसून, पहाटेचा कडाका आणि दुपारचे ऊन यातील तफावतीमुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण देखील निर्माण झाला आहे. गेल्या आठ दिवसांत शहराच्या किमान तापमानात १.६ अंश सेल्सिअसची घसरण झाल्याची माहिती प्रादेशिक हवामान विभागाने दिली आहे.

दिवाळीनंतर आता रत्नागिरी जिल्ह्यात थंडीची चाहूल लागली आहे. पहाटेच्या वेळी शहरासह ग्रामीण भागात धुक्याची चादर पसरत असून उशिरा सूर्यदर्शन होत आहे. मुंबई-गोवा महामार्गावरही धुक्याचे प्रमाण वाढल्याने वाहनचालकांना कमी दृश्यमानतेचा सामना करावा लागत आहे. हवेत गारवा आणि तापमानात घट झाल्याने वाहतुकीचा वेगही मंदावला आहे.

सरकारकडून प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाखांचा निधी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

नागपूर : राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी सरकारने व्यापक कृती आराखडा तयार केला असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी ११ महत्त्वाच्या विभागांना जबाबदारी सोपविण्यात आली आहे. चारा संवर्धनापासून जलसंधारणापर्यंत सुमारे ४५ ते ४६ निर्णयांच्या माध्यमातून दुष्काळग्रस्त भागांना दिलासा देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीला जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीसी) माध्यमातून १५ लाख रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. तसेच कोळसा आणि मँगनीज खाणींमधून बाहेर पडणारे पाणी नदी-नाल्यांमध्ये सोडण्याऐवजी ते शेतकऱ्यांच्या उपयोगात आणण्याची योजना सरकार आखत आहे. नागपूरचे पालकमंत्री आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी याबाबत माहिती दिली.

राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी विविध विभागांच्या योजनांमध्ये आवश्यक बदल करण्यात येत आहेत. डीपीसीच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या योजनांमध्येही मोठ्या प्रमाणात फेरबदल करण्यात आले आहेत. अनावश्यक कामांना फाटा देऊन दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांना प्राधान्य देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे उपलब्ध



१५ लाख शेतकऱ्यांना फार्मर आयडीचा लाभ

निधीचा उपयोग थेट दुष्काळग्रस्त भागातील नागरिकांना आणि शेतकऱ्यांना होणार आहे. प्रत्येक ग्रामपंचायतीला १५ लाख रुपये देऊन त्या गावाचा स्वतंत्र जलसंधारण आणि ग्रामविकास आराखडा तयार करण्यात येणार आहे. पशुसंवर्धन, मत्स्य व्यवसाय, जलसंधारण, महसूल यासह एकूण ११ विभागांनी या कामात आपली जबाबदारी स्वीकारली आहे. गावाच्या गरजेनुसार पाणी साठवण, जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, चारा उपलब्धता आणि शेतीशी संबंधित उपाययोजनांवर भर दिला जाणार असल्याची माहिती बावनकुळे यांनी दिली.

दरम्यान, आदिवासी वनपट्टाधारकांना मालकी हक्क आणि शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्याच्या दृष्टीनेही महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. राज्यातील ११ जिल्ह्यांमधील ३५ विधानसभा मतदारसंघांतील आदिवासी बांधवांना प्रॉपर्टी कार्डचा लाभ मिळणार आहे. यामुळे संबंधित शेतकऱ्यांना फार्मर आयडी आणि ॲग्रीस्टॅक नोंदणीसह पीक विमा, किसान सन्मान योजना तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध कृषी योजनांचा लाभ घेता येणार आहे. ज्या शेतकऱ्यांकडे जमिनीच्या मालकीसंदर्भात कोणतीही कागदपत्रे नाहीत; मात्र ते प्रत्यक्षात जमीन कसत आहेत, अशा शेतकऱ्यांनाही दिलासा देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. १ जानेवारी २०१५ पूर्वीपासून जमीन कसणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्यात येणार आहे. राज्यातील सुमारे १५ लाख शेतकऱ्यांकडे फार्मर आयडी नसल्याने त्यांना या निर्णयाचा फायदा होणार असल्याचे ते म्हणाले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महसूल विभागाची जबाबदारी दिल्यामुळे आदिवासी शेतकऱ्यांना जमिनीचे मालकत्व मिळवून देण्याचे काम करता आले, याचा आनंद असल्याची भावना बावनकुळे यांनी व्यक्त केली. आदिवासी शेतकऱ्यांना मालकी हक्कासोबतच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

लातूर जिल्हा बँकेचा फैसला झाला! सहकार पॅनेलची जोरदार मुसंडी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

लातूर : येथील लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सत्ता पुन्हा एकदा काँग्रेसच्या हाती आली आहे. काँग्रेस नेते दिलीपराव देशमुख आणि सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या सहकार पॅनलनं या निवडणुकीत विजय मिळवला. सहकार पॅनलनं १९ पैकी १४ जागी विजय मिळवण्यात यश मिळवलं. सहकार पॅनेलला माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचा मार्गदर्शन मिळालं. सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या पुढाकारात आमदार अमित देशमुख आणि माजी आमदार धीरज देशमुख यांनी पॅनलचं नेतृत्व केलं. जिल्हा बँक निवडणुकीत विजय मिळवल्यानंतर अमित देशमुख, धीरज देशमुख आणि खासदार शिवाजी काळगे यांनी शिट्टी वाजवून आनंद साजरा केला. अमित देशमुख आणि धीरज देशमुख यांनी कार्यकर्त्यांबरोबर या विजयाचा जल्लोष साजरा केला. धीरज देशमुख, आमदार अमित देशमुख आणि खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनी जिल्हा बँक निवडणुकीत सहकार पॅनलनं विजय मिळवल्यानंतर निवडणूक चिन्ह असलेली शिट्टी वाजवून आनंद साजरा केला. राज्याच्या नव्या सहकार धोरणात सहकारी संस्थांच्या संचालक मंडळात किमान एक तृतीयांश महिला सदस्य आणि ४० वर्षांखालील तरुणांचा सहभाग बंधनकारक करण्याचा प्रस्ताव आहे. या निर्णयाचे आमदार अमित देशमुख यांनी स्वागत करत असल्याचं म्हटलंय.



दैनिक
यश सिद्धि न्यूज

संपादकीय....

एल निनोचा प्रभाव

महाराष्ट्रात सध्या हवामानाचे वेगवेगळे रूप पाहायला मिळत आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडीचा कडाका जाणवत असताना, काही ठिकाणी दिवसा उन्हाचा चटका वाढला आहे. दरम्यान, बंगालच्या उपसागरात तयार झालेले 'अकवन' चक्रीवादळ अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. हे चक्रीवादळ २० नोव्हेंबर रोजी आंध्र प्रदेश आणि यानमच्या किनारपट्टीवर धडकण्याचा भारतीय हवामान विभागाचा अंदाज आहे. या पार्श्वभूम ीवर महाराष्ट्रातील काही भागांतही पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. बंगालच्या उपसागरातील कमी दाबाच्या क्षेत्राचे रूपांतर चक्रीवादळात झाले असून, त्याची तीव्रता वाढण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. हे चक्रीवादळ २० नोव्हेंबर रोजी दुपारच्या सुमारास आंध्र प्रदेशातील नेल्लोर आणि तुनीदरम्यानच्या किनारपट्टीवर धडकण्याचा अंदाज आहे. त्यावेळी वाऱ्यांचा वेग ताशी १२० ते १३० किलोमीटर, तर झोतांचा वेग ताशी १४५ किलोमीटरपर्यंत पोहोचू शकतो. चक्रीवादळाचा म हाराष्ट्रावर थेट परिणाम अपेक्षित नसला, तरी त्याच्या प्रभावामुळे काही भागांत हवामानात बदल होऊ शकतो. हवामान विभागाच्या १६ नोव्हेंबरच्या अंदाजानुसार, २१ नोव्हेंबर रोजी पूर्व विदर्भातील काही ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस, तर तुरळक ठिकाणी म ुसळधार पावसाची शक्यता आहे. त्यामुळे विदर्भातील नागरिकांनी हवामान विभागाच्या पुढील सूचनांकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे. राज्यात उत्तरेकडून येणाऱ्या थंड वाऱ्यांमुळे रात्री आणि पहाटे गारठा वाढल्याचे चित्र आहे. उत्तर महाराष्ट्र आणि घाटमाथ्याच्या भागात थंडी जाणवत असून, कोकणातील काही भागांतही तापमानात घट झाल्याचे सांगितले जात आहे. मात्र, दिवसा उन्हाचा चटका कायम असल्याने सकाळ-संध्याकाळ गारवा आणि दुपारी उष्णता अशी स्थिती अनुभवायला मिळत आहे. एल निनोच्या प्रभावामुळे आगामी काळातील तापमान आणि मान्सूनच्या वाऱ्यांवर काय परिणाम होणार, याकडे हवामान अभ्यासकांचे लक्ष आहे. मात्र, त्याचा नेमका परिणाम आणि कालावधी याबाबत अधिकृत हवामान अंदाजांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. त्यामुळे पुढील काही दिवस महाराष्ट्रातील हवामानात होणारे बदल लक्षात घेऊन नागरिकांनी सूचनांचे पालन करावे,असे वाटते.

दिवंगत अजित पवार ग्रामीण विकास व सहकार क्षेत्रातील ज्ञानकोष आणि नव्या नेतृत्वासाठी विद्यापीठ : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

(पान १ वरून...) शिस्त सर्वांनी अनुभवली आहे. मंत्रालयातही लवकर उपस्थित राहून कामांचा निपटारा करण्याची त्यांची पद्धत होती. महाराष्ट्रातील अनेक विकास प्रकल्पांवर त्यांच्या कामाचा ठसा आहे. वरकरणी कणखर वाटणारे अजितदादा जवळच्या माणसांवर तितकेच उत्कट प्रेम करायचे. सहकारी म्हणून त्यांनी दिलेली साथ आणि मार्गदर्शन कायम स्मरणात राहील. सध्याच्या दुष्काळी परिस्थितीतही त्यांची पदोपदी आठवण येते, असे मुख्यमंत्री म्हणाले.

अजितदादांच्या अपघाती निधनाच्या चौकशीचा चौकशीचा अहवाल लवकरात लवकर यावा यासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्याकडे विनंती केल्याचे फडणवीस यांनी सांगितले. अजितदादांसारखे नेतृत्व संघर्षातून घडते. शेती-मातीशी आणि साम ान्य माणसाशी नाळ जोडलेले असे नेतृत्व निर्माण होण्यासाठी अनेक वर्षे लागतात. त्यांनी अपूर्ण ठेवलेले कार्य पुढे नेण्यासाठी आणि त्यांच्या स्वप्नातील महाराष्ट्र घडविण्यासाठी एकत्रित प्रयत्न करावेत, असे आ-वाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले.

अजितदादा पुणे जिल्ह्या-चा विकासाचे शिल्पकार - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, दिवंगत अजितदादांचे पुणे आणि बारामतीशी राजकारणापलीकडचे जिव्हाळ्याचे नाते होते. आमदार, विरोधी पक्षनेते आणि उपमुख्यमंत्री अशा विविध पदांवर त्यांनी काम केले. सहकार क्षेत्राचाही त्यांना दांडगा अनुभव होता. साखर कारखाने अडचणीत असताना त्यांच्या प्रयत्नातून केंद्र सरकारने साखर कारखान्यांवरील प्राप्तिकर माफ करण्याचा निर्णय घेतला. शासकीय वास्तूच्या माध्यमातून नागरिकांना न्याय आणि सुविधा मिळाल्या पाहिजेत, अशी त्यांची भूमिका होती. वास्तूंचे बांधकाम करताना प्रत्येक बाबीवर ते बारकाईने लक्ष देत असत. परखडपणा, स्पष्टवक्तेपणा, निर्भीडपणा आणि प्रेमळपणा हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे वैशिष्ट्य हो-ते. सामान्य नागरिकांचे कल्याण हा त्यांच्या प्रत्येक निर्णयाचा केंद्रबिंदू असायचा. विविध योजनांची आणि प्रकल्पांची सखोल माहिती घेऊन ते निर्णय घेत असत.

पुणे जिल्ह्यासह महाराष्ट्राच्या विकासात अजितदादांचे मोठे योगदान आहे. पुणे मेट्रो, रिंग रोड आणि वाहतूक कोंडी सोडविण्यासारख्या महत्वाच्या प्रकल्पांमध्ये त्यांची भूमिका म ोलाची होती. पुण्याचा कायापालट करण्यात त्यांनी महत्त्वाचे योगद-ान दिले. त्यामुळे त्यांना पुणे जिल्ह्याच्या विकासाचे शिल्पकार म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांच्या दूरदृष्टीतून सुरू झालेले प्रकल्प पूर्ण करणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल, असे शिंदे म्हणाले.

अजितदादांच्या स्वप्नांचा प्रवास आपण सर्वजण पूर्ण करू - उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार म्हणाल्या, लोकनेते अजितदादांच्या पुतळ्याचे अना-वरण होत असलेला आजचा क्षण अत्यंत भावनिक आहे. ज्या पुणे जिल्ह्याच्या विकासासाठी त्यांनी आयुष्य वेचले, त्याच जिल्हा परिषदेच्या प्रांगणात त्यांचा पुतळा उभारला जात आहे, ही अभिमाना-ची बाब आहे. महाराष्ट्रातील छोट्या गावांपर्यंत त्यांच्याविषयी असलेले प्रेम हेच त्यांच्या कार्यकर्तृत्वाचे खरे प्रमाणपत्र आहे. अजितदादांचे मातीशी असलेले नाते, ग्रामीण भागातील नागरिकांशी असलेला संवाद आणि विकासकामांचा सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची कार्यपद्धती वैशिष्ट्यपूर्ण होती. शेती, सहकार आणि ग्रामीण विकासाच्या प्रश्नांवर त्यांनी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला.

जिल्हा परिषदेच्या विकासाला दिशा देताना अजितदादांनी केवळ इमारती उभारण्याचा विचार केला नाही, तर गावखेड्यातील माणसांचे भविष्य घडविण्याला प्राधान्य दिले. कार्यालयात येणाऱ्या सामान्य नागरिकांना सुविधा मिळाव्यात, परिसर स्वच्छ आणि सुंदर अस-ावा, याबाबत त्यांचा आग्रह होता. पर्यावरणाबद्दलही त्यांना विशेष आस्था होती. त्यांच्या स्मृती जपण्यासाठी प्रत्येक गा-वात, शाळेत आणि आरोग्य केंद्राच्या परिसरात झाडे लावून ती जगविण्याचा संकल्प करूया, असे आवाहन त्यांनी केले.

महाडचा सत्याग्रह : सामाजिक समतेचा व मानवमुक्तीचा क्रांतीकारी लढा

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समग्र सामाजिक तत्वज्ञानात मानवमुक्ती, मानवी स्वातंत्र्य व सामाजिक-धार्मिक व सांस्कृतिक गुलामगिरीतूनअस्पृश स्मृश तसेच शुद्रातिशूद्ध समाजाची मुक्तता हे चार घटक (यांच्या विचार व कृती कार्यक्रमाच्या केंद्रस्थानी होते. स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या तीन मानवी मुल्यावर आधारित समाजव्यवरचेचे पुनर्गठन झाले पाहिजे, असा त्यांचा मुळ आग्रह होता. आपल्या आयुष्याची तब्बल तीन दशके त्यांनी विचारसरणी व कृती कार्यक्रम अशा दोन्ही आघाड्यावर मानवमुक्तीचा लढा उभारला होता. पर्यायाने, बाबासाहेबांचे मानवमुक्तीचे तत्वज्ञान अभ्यासताना त्यांची मानवमुक्तीची चळवळ' अगदी केंद्रस्थानी ठेवावी लागते हेच गृहितक स्विकारून प्रस्तुत लेखात मांडणी करण्यात आली आहे. तत्कालीन हिंदूधर्मव त्यातील तत्वज्ञान आचासल्यानंतर अस्पृशः तेचे उच्चाटन व जाती प्रथेचे निर्मूलन हे (यांनी आपले जीवित कार्य ठरविले होते. हिंदू धर्म ग्रंथांनी निर्माण केलेली व जाणीवपूर्वक जोपासलेली अस्पृशतेची अम ानुष प्रथा हा भारतीय समाजव्यवस्थे वरील फार मोठा कलंक असून जो पर्यंत या समाजातून त्यांचे समूळ उच्चाटन होत नाही तो पर्यंत हा देश एकजिनसी होऊ शकत नाही. या निष्कर्षापर्यंत ते आले होते. आ-पले शिक्षण पूर्ण करून मायदेशी परत येताच त्यांनी आपल्या या

जीवित कार्याला सुरुवात केली स.न. १९२० ते १९३५ या पंधरा वर्षाच्या काळात त्यांनी वरील प्रश्नांच्या अनुशंगाने हिंदू- सनातनवादी समाजात व धर्मात काही सुधारणेला वाव आहे का? यावर विचारमंचन सुरू केले. काही सुधारणावादी, म तपरिवर्तनवादी विचार मांडून तसेच काही चळवळी उभ्या करून अंदाज घेण्यास सुरुवात केली होती. 'बहिष्कृत भारत' हे वृतपत्र सुरू करून हिंदू धर्मग्रथांची चिकित्सा सुरु केली. संघटनात्मक पातळीवर लढा उभारण्यासाठी 'बहिष्कृत हितकारिणी सभा स्थ-ापन केली. दुसऱ्या बाजूने कायदेशीर- सनदशीर मार्गाचा अवलंब करून अनिष्ठ रुढी परंपरा व सनातन धर्मातील जाचक व अमानवीय संहिता विरोधी काही कायदे व ठराव मंजूर करून त्या मार्गाने काही परिवर्तन होते काय? यापद्धतीनेही प्रत्यत्न सुरु केले उदा: मुंबई कौन्सिढचे सदस्यत्व मिळाल्यानंतर ठराव करून अस्पृश समाजासाठी, सार्वजनिक ठिकाणे पाणवठे खुढे करण्याचा ठराव मंजुर करत घेतला. दुसऱ्या बाजूने परिषद, आंदोढने, मोर्चे इत्यादि आयुधांचा अवलंब करून सनातनी ब्राम्हणी प्रवृत्तीत काही सकारात्मक बदढ होतो का? याची चाचपणी करून पाहिली. (याचाच एक भाग म्हणून महाडच्या चवदार तळयाचा सत्याग्राह मनुस्मृतीचे दहन, नाशिकच्या काळाराम मंदिरात प्रवेश इत्यादि ठिकाणी शांततापूर्ण मार्गाने आंदोलने उभारली. परंतु त्यांचा भ्रमनिराश झाला, आणि त्यांनी हिंदु धर्म व धर्मग्रंथाची चिकित्सा सुरू केली, 'जो धर्म माणस-ाला माणूस मानत नाही, त्याला माणसांचा विटाळ होतो, तो धर्म नसून शिरजोरीची सजावट आहे, एक शुद्ध वेडगळपणा आहे. प्रस्तुत लेखात हेच सहितक स्विकारून त्यांच्या महाड सत्याग्रहाची (चवदार तळे सत्याग्रह व मनुस्मृतीचे दहन) या दोन्ही आंदोलनाची व त्यासाठी आखलेल्या कृती कार्यक्रमाची सविस्तर चर्चा करण्यात आली आहे.

ऐतिहासिक पार्श्वभूमी'

बाबासाहेबांचे हे दोन्ही सत्याग्रह म्हणजे मानवम ुक्तीच्या लढ्यातील क्रांतीकारी पाऊल होते, पर्यामाने ती एका समाजक्रांतीची सुरुवात होती. अमेरिकन सु-धारक मार्टिन ल्यूथर किंग यांनी तेथील गुलामगिरीच्या विरोधात उभा केलेल्या लढ्याचा कितीतरी अग-ोदर (१९६८) बाबासाहेबांनी महाड येथे देशातील सामाजिक-सांस्कृतिक गुलामगिरीच्या विरोधात लढा उभा केला होता.

वर स्पष्ट केल्याप्रमाणे बाबासाहेबांनी वैचारिक व कायदेशीर मार्गाने अस्पृशता निर्मुलनाची चळवळ सुरु केली होती. सन. १९२३ मध्ये मुंबई कौन्सिलचे सदस्य झाल्यानंतर ४ ऑगस्ट, १९२४ रोजी मुंबई प्रांतिक कोझिलमध्ये एक ठराव पास करून घेतला होता, त्यानुसार 'महाराजातील सर्व सार्वजनिक ठिकाण, पाणवठे अस्पता समाजासाठी खुली करण्यात आली होती. या ठरावाला अनुसरून तत्कालीन महाड नगरपरिषदेने ऑगस्ट १९२४ मध्ये एक स्वतंत्र ठराव करून नगराध्यक्ष रावबहादुर सिताराम केशव बोके यांनी महाड सेचातील सर्व पाणवठे सर्व समाजासाठी खुले करण्याचा ठराव मंजूर केला. मात्र हे दोन्ही ठराव मंजूर होऊन देखील सनातनी ब्राम्हण्यवाद्यांनी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी घेऊ दिली नव्हती पर्यायाने दोन्ही ठराव केवळ कागदावरच राहिले. तब्बल तीन वर्षे अस्पृशांना चवदार तळ्याला स्पर्श करू दिला नाही. कागदावर, कायदेशीर मार्गाने प्राप्त झालेला हा अधिकार प्रत्यक्षात आणण्यासाठी एका सामाजिक संघर्षाची गरज त्यांना व त्यांचा काही सवर्ण सहकाऱ्यांना निर्वतन भासू लागली. त्यातूनच महाडच्या सत्याग्रहाचा जन्म झाला. या आंदोलनाचे नेतृत्व बाबासाहेबांनी केले असले तरी अनेक सवर्ण नेत्या-कार्यकर्त्यांनी सक्रियपणे या दढ्यांना पाठिबा दिला होता. ज्यात प्रामुख्याने. सि.के. बोले, सुरेंद्रनाथ टिपणीस, भाई गंगाधर चिचे, गंगाधर सहस्त्रबुद्धे रा.ना. जोशी, कदम इत्याहिंनी सहभागी झाले होते. या सर्व निष्ठावंत सहकाऱ्यांनी या दोन्ही आंदोलनाला मानसिक आधार व संघटनात्मक बळ दिले होते. महाडचा सत्याग्रह बाबासाहेबांनीच करावा यासाठी कुलाबा बहिष्कृत परिषदेचे आयोजन करण्याचा आग्रह धरला. त्यानुसार १९१ २० मार्च २०१७ रोजी परिषद भरविण्यात आली. पुरुष - स्त्रीया मिळून ३००० प्रतिनिधी परिषदेण हजर होते व याच घटनेपासून मानव मुक्तते. चा व मानवी स्वातंत्र्याचा लढा सुरू झाला. महाडचा हा सत्याग्रह म्हणजे या देशाच्या सामाजिक-सांस्कृतिक इतिहासात क्रांतीपूर्व म्हणून ओळखले जाते. २० मार्च १९२७ हा दिवस क्रांतीकारी दिन म्हणून नोंद झाली. कारण परिषद संपल्यानंतर याच दिवशी कोकणातील महाड गावात बाबासाहेबांच्या सक्षम नेतृत्वाखाली चळदार तळयाचा सत्याग्रह झाला. वस्तुत: अस्पृशांनी तक्यावर जाऊन पाणी करणे एवढ्या पुरताच हा सत्याग्रह निश्चितच नव्हता, तर हजारो वर्षापासून अस्पृश समाजाला प्रशान कायम नाकारण्यात आलेल्या मानवी हक्कासाठी, सामाजिक सम तेसाठी बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली अस्पृशव शुद्रातिशुद्ध समाजाने पुकारलेला एल्गार होता, असेच या सत्याग्रहाचे वर्णन का करावे लागेल. या परिषदेत बाबासाहेबांचे आवेशपूर्ण भाषण झाले. आपण हा सत्याग्रह का करत अहोत, या मागच्या मुळ प्रेरणा कोणत्या आहेत! या मुद्दयावर त्यांनी हिरिरीने प्रतिपादन केले.

'सत्याग्रह आली सनातनवाद्यांची प्रतिक्रिया'

से म्हणाले. आपण चवदार तळयाचे फक्त पाणी पिण्यासाठी इथे आलो नाहीत, हे पाणी प्राशन केल्याम ुळे आपण अमर होणार अहोत असेही नाही. आजपर्यंत आपणास ते पिण्यासाठी मिळाले नाही म्हणून आपण काही मेले नाही. आपण इथे केवळ माणूस म्हणून आपला हक्क सिद्ध करण्यासाठी आणि माणूस म्हणून आपल्याला नाकारण्यात आलेले मानवी अधिकार मिळविण्यासाठी आलो आहोत. ते पुढे म्हणाले, 'हा लढा केवळ पाण्याचा नसून माणसाला माणूस म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा आहे. बाबासाहेबांच्या एका भाषणाने शेकडो वर्षापासून दबलेल्या- दडपलेल्या अस्पृश समाजात आत्मसन्मान, स्वाभिमान जागृत झाला व त्यातून एका महान समाजक्रांतीची मुर्तमेढ रोवली गेली हे ऐतिहासिक सत्य नाकारता येणार नाही.





प्राचार्य
डॉ. विठ्ठल एरंडे
मोबाईल- ९९२३३६९१९१

तमाम अस्पृश व परिषदेच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे २० मार्च १९२७ रोजी परिषदेचा सांगता समारंभ पार पडल्यानंतर परिषदेचे मुख्य आयोजक असलेल्या महाड नगरपरिषदेचे अध्यक्ष मा सुरेंद्र टिपणीस, भाईचित्रों अन्य सवर्ण सहकाऱ्यांनी 'चला आता चढदार तळ्यावर पाणी पिण्यास जाऊ' असे सर्वांना आवाहान करून एक शांतता मोर्चा काढला. तिथे पोहचताच बाबासाहेब व मोर्चातील बांधव - भगिनिंनी ओजळीने पाणी प्राशन केले, व एका नव्या पर्वाला सुद्दात झाली. मात्र या घटनेनंतर जिर्णमतवाद्यांनी- सनातनवाद्यांनी फार मोठा कांगावा सुरूकेला. अस्पृशांना तवे बाटवले-विटाळले. फार मोठा धर्मद्रोह झाला आहे अशा वलाना सुरू केल्या. एवढे नाही तर अस्पृशांनी तळे विटाकडे म्हणून गोमुत्र, शेण टाकून पवित्र करण्याचेव ढोंग केले बाबासाहेबांनी या घटनेवर संताप व्यक्त करत गर्जना केली, 'हे धर्मरक्षण नव्हे तर धर्मद्रोह आहे. हा हिंदू धर्मावर्शल कलंक नसून आमच्या देहावरील कलंक आहे.

न्यायालयात या सनातनी तके पवित्र करून थांबले नाहीत तर त्यांनी महाडच्या विरोधात खटला दाखल केला, कोर्टात असा प्रतिवाद करण्यात आला की हे तके सार्वजनिक वा सरकारी मालकीचे नसून खा-जगी आहे. या तळयाचे नाव चौथरी तढे असे आहे. न्यायालयात खटला उभा राहिल्यानंतर नगराध्यास सुरेंद्र टिपणीस यांची महत्वाची साक्ष झाली. त्यांनी आपल्या जवाबात सांगितले हे तवे खाजगी नसून सरकारी आहे कारण या तक्यातील गाळ उपसण्यासाठी सरकारने पाचशे रुपयाचा निधी मंजूर केला होता. असे सर्व पुरावे त्यांनी न्यायालयात सादर केले. न्यायालयाने आंदोलकांच्या बाजूने निर्णय दिला. मात्र काही लोकांनी पुन्हा तात्पुरता मनाई हुकूम मिळवून अस्पृशांना तव्यावर जाण्यास प्रतिबंध करणारा तात्प-रता मनाई हुकूम मिळविला. पुन्हा वादग्रस्त परिस्थिती उद्भवली- काही सनातनी हिंदूनी परिषदेतील अस्मृश समाजावर हल्ले केले, सभामंडपातच प्रचंड मारहाण करण्यात आली. मात्र बाबासाहेबांच्या आदेशानुसार आंदोलक शांततापूर्ण अहिंसक पध्दतीने आंदोलन यावर ठाम राहिले: सुमारे तीन हजार प्रतिनिधी असतानाही कोणताही अंकुर अनुचित प्रकार घडला नाही हे विशेष. पुढे तब्बल दहा वर्षांनी १९३७ मध्ये उच्च न्यायालयात या प्रकरणाचा निकाल लागला. चवदार तके हे सरकारी मालकीचे आहे पथार्थाने सर्वाना वापरण्याचा अधिकार आहे असा कोर्टाने निकाल दिला.

मनुस्मृतीचे दहन

महाडची पहिली परिषद यशस्वी झाल्यानंतर सनातनवाद्यांनी तळे शुद्धीकरणाची जी मोहिम राव-वती त्यामुळे बाबासाहेब अधिकच अंतर्मुख झाले. आता केवळ सत्याग्रह, परिषदा घेऊन अपना दिवाण करून अस्पृशतेचा प्रश्न सुटणारा नाही किंवा हिंदू धर्मात सुधारणा होणार नाही हे त्यांचा लक्षात आले. तेव्हा आपणास या मानवी विषमतेच्या मुद्रापर्यंत जावे लागेल अशी त्यांची धारणा झाली. आणि यातूनच मनुस्मृती दहन' करण्याची योजना त्यांनी आखली माणसाने (अस्पृश) बाटवलेले तवे प्राण्यांच्या मुत्राने कसे काय पविच होते? या प्रश्नाचे उत्तर शोधतांना त्यांच्या लक्षात आले की, या मागे हिंदू धर्मातील विषमतामुलक विचार कारणीभूत आहे. तेंव्हा अशा संचांची होळी केली पाहिजे, त्यासाठी वैचारिक बंड करण्याची गरज आहे. असा विचार त्यांचा मनात घोळत होता. याच पार्श्वभुम ीवर २५ डिसेंबर रोजी दुसरी महाड़ परिषद भरविण्यात आली. मनुस्मृती नाकारणे व सनातनवाद्यांना धक्का देणे त्यांना गरजेचे वाटले. कारण जो ग्रंथ जन्मावर आधारित चातुरवण्य व्यवस्थेचे समर्थन करतो बहुजन समाजाला व स्त्रीयांना शिक्षणापासून वंचित ठेवतो, स्त्रीयांना अत्यंत हिन दर्जा देतो, अशा जुलूमी व्यवरचेला व त्यातून अस्तित्वात येणाऱ्या मानसिक गुलामगिरीला छेद देणे अपरिहार्य होते. त्यातच सनातनवाद्यांनी चवदाळ तळयाचा प्रश्न न्यायप्रविष्ट केला होता, त्याची प्रतिक्रिया म्हणून बाबासाहेबांनी जाणीवपूर्वक दुसरी महाड परिषद आयोजित केली होती. विषमतेच्या मुळावरच घाव घालण्याचा हा एक धाडसी असा कृती कार्यक्रम होता, गंगाधर

परिषदेत बाबासाहेबांचे ब्राम्हण सहकारी । निलकंठ सहस्त्रबुध्दे यांनी मनुस्मृतीचे दहन करण्याचा प्रस्ताव म ांडला व राजभोज यांनी त्यास अनुमोदन दिले आणि हजारो जनसमुदायाच्या उपस्थितीत २७ डिसेंबर १९२७ रोजी सायंकाळी एका कुंडात मनुस्मृतीचे दहन करण्यात आले. हा दिवस आज देशात 'सामाजिक समता दिवस' म्हणून पावला जातो. मनुस्मृतीचे दहन करताच सनातनवाद्यांनी प्रचंड आर आगपाखड सुरू केली. बाबासाहेब आंबेडकर धर्मद्रोही आहेत असा आरोप करण्यात आला. वृत्तपत्राकडून संमीय प्रतिक्रिया छापण्यात आल्या. दिनबंधू - विजयी मराठा या वृतपत्रांनी मनुस्मृती दहनाचे समर्थन करत ही मानवी हक्काची क्रांती आहे असा उल्लेख केला. केसरी ने मात्र सावध भूमिका घेतली. परिषदेत अस्पृश समाजावर झालेल्या हल्ल्याचा विशेष निषेध केला मात्र मनुस्मृतीसारखा ग्रंथ दहन करणे योग्य नाही अशी प्रतिक्रिया दिली. काही सनातनी वृतपत्रांनी 'महाडमध्ये हिंदू धर्मावर फार मोठा आघात झाला अशा मथळयाखाली वृत प्रसिद्ध केले. एवढेच नाही तर बाबासाहेब आंबेडकर' बंडखोर' आणि समाजात फूट पाडणारे नेते' म्हणून प्रचंड टिका केली म ात्र तत्कालीन इंग्रज वृतपत्रांनी या घटनेची नोंद अस्मृश समाजाचा फार मोठा, उठाव वा बेड उ ारक्षी लळीं-ळश्र ीर्शीश्रीं श्रलू ींपीींलिहरलश्रशी) अशी घेतली होती. या सर्व प्रतिक्रियांचा समाचार घेतांना बाबासाहेबांनी आपल्या बहिष्कृत भारत वृतपलात लिहले की आमचा लढा हिंदू धर्माविरुद्ध नसून, धर्मातील विषमतेचे कायदे सांगणाऱ्या ग्रंथाविरुद्ध आहे. मळण्याला गुलाम करणारे व गुलामगिरी जोपासणारे कायदे दहन करण्याचा अधिकार आम्हाला आहे'-

बाबासाहेबांची प्रतिक्रिया

पुढे ३ फेब्रुवारी, १९२८ रोजी बहिष्कृत भारत वृतपत्रात बाबासाहेबांनी एक अग्रलेख लिहून सडेतोड उत्तर दिले. ते म्हणाले, 'आम्ही मनुस्मृतीचे दहन केले कारण तो ग्रंथ अस्पृश व शुद्रातिशुद्र सम कोट्यावधी समाजाला माणूस म्हणून जगण्याचा अधिकार नाकारतो. जो ग्रंथ जन्माच्या आधारे श्रेष्ठ-कनिष्ठ असा भेदभाव करतो, स्त्रियांना गुलाम बनवतो म्हणून हा धर्मग्रंथ नसून ती एक सामाजिक अन्यायाची आचारसंहिता आहे. तत्पर्य महाड परिषदेतील या दोन्ही घटनामुळे 'महाडचा संघर्ष' एका पाणवठ्याच्या प्रश्ना जाऊन जत्तीन्यवरचे विरुध्दच्या व्यापक अरग समाजक्रांतीचे प्रतिक व प्रेरणा बनला.

पलीकडे

वास्तविक पहाला चवदार तक्याचा सत्याग्रह असो की मनुस्मृतीचे दहन या दोन्ही घटना मागे कुणा व्यक्ती अथवा समाज यांचा व्देष करणे हा उद्देश नक्कीच नव्ह-ता, तर मानवी समतेला व मानवी स्वातंत्र्याला पर्याचाने आत्मसन्मानाला नाकारणाऱ्या एका समाजव्यवस्थेला दिलेला नकार होता. या दोन्ही सत्याग्रहामुळे अस्मृश समाजात हक्काच्या प्राप्तीसाठी ताठ मानेने उभे राहण्याचा आत्मविश्वास निर्माण केला. आज या घटनेला शंभर वर्षाचा कालावधी होतो आहे. बाबासाहेबांच्या हयातील व त्यानंतर तथाकथित लोकशाही व्यवरचेत मानवाची सर्वागंण मुक्तता, सामाजिक समता व त्याचे स्वातंत्र्य हे प्रश्न आजही कितपत सुद आहेत हा प्रश्न आहे. वस्तुतः महाड सत्याग्रह (चवदार तळे सत्याग्रह आणि मनुस्मृतीचे दहन) या घटनेचे फार मोठे ऐतिहासिक म हत्व आहे, तसेच या लढ्यांची प्रस्तुतता देखील आहे. तेव्हा केवळ एक ऐतिहासिक घटना एवढेच विश्लेषण पुरेसे ठरत नाही. एक शतकापूर्वी एका समाजक्रांतीची झालेली सुरुवात, तिची उद्दिष्ट्ये अभ्यासताना आज एक शतकानंतर तरी आपण एका परिपूर्ण समाजाची उभारणी झाली आहे काय? या प्रश्नाचे उत्तर सरक सरक नाही असेच आहे. आज संवैधानिक पातळीवर व कायदेशीरहण्या अस्पृशता निषिद्ध असलीतरी सामाजिक भेदाभेद, जातीय पुर्वग्रह - जातीय अभिनिवेश, समान संधीचा अभाव हे प्रश्न संपले नाहीत. दलित समाज, स्त्रीया यांच्यावर अत्याचार सुरूच आहेत. तेव्हा महाडच्या आंदोलनाचे स्मरण करताना सामाजिक वास्तवाचे कठोर आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. महाडच्या सत्याग्रहाने दलित-वंचित समाजघटकाला मानवाचे अधिकार, आत्मसन्मान आणि समानतेसाठी संघर्ष करण्याची प्रेरणा दिली. तेव्हा महाड सत्याग्रहाचे महत्व अधोरेखित करताना बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारसरणीला प्रस्तूत कालखंडाशी नाळ जोडण्याचा व भावी दिशादर्शन करण्याचा एक मार्ग आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. दुसरा अत्यंत महत्वाचा पैलू म्हणजे सामाजिक-धार्मिक स्वातंत्र्यामीवाय राजकीय स्वातंत्र्य परिपूर्ण ठरत नाही हा देखील संदेश था लढयातून घेतला पाहिजे. तात्पर्य, महाड चवदार तळयाचा सत्याग्रह आणि मनुस्मृतीचे दहन

या दोन्ही घटना डॉ. बाबासाहे बांच्या समग्र चळवळीत व वैचारिक बैठकीत केंद्रस्थानी होत्या. आज आपण दोन्ही लढयाची शतकमहोत्सव सामाजिक सबलीकरण दिन' व सामाजिक समता दिवस म्हणून साजरा करत आहोत.

महत्व आणि प्रस्तुतता'

या दोन्ही घटना ही केवल इतिहासातील दोन पाने नसून या देशाच्या लोकशाही व्यवखेची आणि समतेची पायाभरणी करणारी प्रक्रिया आहे. आज आपण ज्या संवैधानिक व्यवस्थेत जगत अहोत आणि त्या संविधानाला समतेचा जो बळकट पाया प्राप्त झाला आहे त्याचे बिजार-ोपण महाडच्या चवदार तळ्यातून उगवले आहे. व जि विषमता राज्यघटनेने नष्ट केली आहे, तीचा मनुस्मृती दहनातूनच नायनाट झाली आहे. शिवाय भारतीय संविधानात प्रतिबिंबीत झालेली समता, स्वातंत्र्य, बंधुता व सामाजिक न्याय महाडच्या संघर्षातूनच उदयास आलेली आहेत. उपरोक दोन्ही लढयाच्या प्रेरणेतूनच देशातील वंचित-पिडित समुह घटकात शिक्षण स्वाभिमान आणि आपल्या अधिकाराची जाणीव निर्माण झाली हि वास्तविकता आहे. बाबासाहेबांनी या व्यवस्थेविरुद्ध संघर्ष करताना शिक्षण संघटन आणि न्याय्य हक्कासाठी संघर्ष या मार्गाचा प्रभावीपणे अवलंब केला. महाडच्या दोन्ही सत्याग्रहातून त्यांनी या देशाच्या समाजव्यवरचे समोर एक मुलभूत प्रश्न उपस्थित केला की, सार्वजनिक साधनसंपत्तीवर जन्माच्या आधारावर कोणाचा अधिकार नाकारला जाऊ शकतो का? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी चवदाळ तक्याला स्पर्श करून व मनुस्मृतीचे दहन करून दिले. इथे एक बाब प्रकर्षाने लक्षात घेतली पाहिजे की, या दोन्ही घटनाकडे केवळ चळवळीचा इतिहास म्हणून नक्कीच पहाता येणार नाही कारण ही मानवी स्वातंत्र्याची पहाट होती. एवढेच नाही तर भारताच्या भावी सामाजिक-राजकीय व्यवस्थेवर मुलगामी प्रभाव टाकणारी सिद्ध झाली आहे. स्थळ काळ, परिस्थिती बदलली असली तरी या क्रांतीकारी बदलांचे प्रेरणास्थान या दोन्ही घटना साक्षीदार आहेत. प्रस्तुत लेखाचा समारोप करताना या बाबीवर प्रकाश टाकणे क्रमप्राप्त ठरते.

.मुळातच आधुनिक भारताच्या इतिहासात हा सर्वात मोठा व तेवढाच गौरवशाली असा मानव मुक्तीचा व मानवी स्वातंत्र्याचा लढा होता. एखाद्या सार्वजनिक पाणवण्यावर जाऊन किंवा एखादा कागदी धर्मग्रंथ जावून समाधान मानून घेण्यापुरताच संदर्भ या चळवळीला निश्चितच नाही, व तेंव्हा देखील नव्हता. माणसाला माणूस म्हणून सन्मान बहाल करण्यासाठी उभारलेली एक बंडखोर चळवळ होती. या दोन्ही आघाड्यावर (चढदारतले लढा आणि मनुस्मृतीचे दहन) बाबासाहेबांनी विचार आणि कृती अशा दोन्ही शस्त्राचा प्रभावीपणे वापर करत विषमतेल म ुठमाती देण्याचा यशस्वी प्रयत्न केला, व एका नव्या व्यवरचेची पायाभरणी केली. मनुस्मृती सारख्या विषम तामूलक ग्रंथाने (धार्मिक कायद्याने) ज्या बहुजनवादी, शुद्रातिशुद्ध महिला वर्गाला शतकानुशतके शिक्षण, संपत्ती आणि आत्मसन्माना पासून वंचित ठेवले होते, त्यांना बाबासाहेबांनी वैचारिक व सामाजिक स्वातंत्र्याची दिशा दिली. आज तब्बल एक शतकानंतर महाडचा सत्याग्रह आपणास पुन्हा पुन्हा सारण करून देतो की, देशाला प्राप्त झ स्वातंत्र्य व व्यामाध्यमातून अस्तित्वात आलेली लोकशाही व्यवस्था तेंव्हाच अर्थपूर्ण ठरू शकेल जेष्टा सामाजिक स्वातंत्र्य, समानता, अवाणि बंधूभाव आणि मानवमात्राची प्रतिष्ठा प्रत्येक समाजात प्रत्यक्षात लाभदायक सिद्ध होईल. आज महाडच्या लढ्याची शताब्दी साजरी करत असताना झालेले राजकीय -

ती केवळ ऐतिहासिक घटनाचे सारण ठरु नये तर व्यक्ती म्हणून प्रत्येकाला एक मुल्ये असले पाहिजे. या

२० वर्षांची प्रतीक्षा संपली! वागदरीत अक्कमहादेवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना व सभागृहाचे लोकार्पण उत्साहात



आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या स्थानिक विकास निधीतून ८ लाखांचे सभागृह साकार; महिला भजन मंडळाचे स्वप्न अखेर पूर्ण

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

वागदरी/प्रतिनिधी : वागदरी येथील ग्रामस्थांची गेल्या २० वर्षांपासून प्रलंबित असलेली सभागृहाची मागणी अखेर पूर्ण झाली असून, अक्कलकोटचे लोकप्रिय आमदार मा. श्री. सचिनदादा कल्याणशेट्टी यांच्या स्थानिक विकास निधीतून (४५१५) मंजूर झालेल्या ८ लाख रुपयांच्या निधीतून उभारण्यात आलेल्या सभागृहाचा लोकार्पण सोहळा तसेच श्री अक्कमहादेवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापना सोहळा मोठ्या भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

अक्कलकोट पंचायत समितीचे उपसभापती तथा जनतेचे लाडके नेतृत्व मा. श्री. सागरदादा कल्याणशेट्टी यांच्या शुभहस्ते सभागृहाचे लोकार्पण व श्री अक्कमहादेवी मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

गेल्या दोन दशकांपासून वागदरी येथील श्री अक्कमहादेवी भजन मंडळातील महिला भगिनींना स्वतंत्र सभागृह असावे, अशी अपेक्षा होती. महिलांची ही मागणी लक्षात घेऊन आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी यांनी निधी उपलब्ध करून दिल्याने महिला मंडळाचे अनेक वर्षांचे स्वप्न साकार झाले आहे. या सभागृहामुळे गावातील धार्मिक, सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी हक्काचे व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.

या मंगलमय सोहळ्यास शिवयोगी तांबोळी, मल्लिकार्जुन स्वामी, सुनील सावंत, परमेश्वर शेळके, शारदाताई रोटे, प्रदीप पाटील, शिवराज पोमाजी, रमेश मंगाणे, संतोष पोमाजी, जयश्री बटगेरी, शिवानंद ढोपरे यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक, महिला भजन मंडळाच्या भगिनी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

श्री अक्कमहादेवी मूर्ती प्राणप्रतिष्ठापनेच्या धार्मिक विधींमुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. महिला भगिनींचा उत्स्फूर्त सहभाग आणि ग्रामस्थांची मोठी उपस्थिती यामुळे सोहळ्याला विशेष शोभा प्राप्त झाली.

गेल्या २० वर्षांपासूनची मागणी पूर्ण करून गावाला सभागृहाची सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल उपस्थित ग्रामस्थांनी आमदार सचिनदादा कल्याणशेट्टी आणि उपसभापती सागरदादा कल्याणशेट्टी यांचे आभार व्यक्त केले.

या सभागृहामुळे वागदरी गावातील महिला मंडळाच्या धार्मिक उपक्रमांसह विविध सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांना नवी दिशा मिळणार असून, गावाच्या एकात्म तेला आणि विकासाला बळकटी मिळणार आहे.

दुष्काळाच्या साखर कारखानदारीला मोठा फटका; ५०० ते ७०० अनुदान देण्याची मागणी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूरनंतर पावसाने पाठ फिरवल्यामुळे सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील काही भागात दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाले आहे. त्याचा मोठा फटका ऊस उत्पादकांना व कारखानदारीला बसू लागला आहे पाण्याअभावी उसाची वाढ खुंटली आहे. म्हणावं तसा उसाची वाढ न झाल्यामुळे रिकवरी व आवरेज मध्ये फरक पडत आहे. तसेच अनेक ठिकाणी ऊस वाळू लागला आहे. परिणामी साखर कारखान्याला मिळणारा साखर उतारा मध्ये घट निर्माण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यात सरासरी दहा ते अकरा टक्क्यापर्यंत यंदा मिळणारा उतारा आठ ते दहा दरम्यान येत असलेली कारखानदारासमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.

एक नोव्हेंबर पासून यंदा गाळापाचा हंगाम सुरू होऊन पंधरा दिवस अधिक कालावधी उलटला असला तरी सध्या अनेक कारखानदारांनी सध्याची पहिली उचल जाहीर केली नाही ऊस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये अद्याप अडचण निर्माण झाले. स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह शेतकरी संघटनेच्या वतीने तीन हजार पाचशे रुपये देण्याची मागणी लावून धरली आहे. दुसरीकडे कमी उतारा व कमी कालावधीत हंगाम यामुळे. कारखाने चालवणे आर्थिक दृष्ट्या कठीण होत असल्याने. त्यामुळे साखर कारखानदारांनी केंद्र शासनाकडे प्रति टन पाचशे रुपये ते ७०० रुपये अनुदान देण्याची मागणी केली आहे.

यांचा काळात हंगाम दुष्काळी परिस्थिती पाहून एक नोव्हेंबर पासून सुरू करण्यात आला आहे. राज्यातील सुमारे २०० कारखान्यांना गाळपची परवानगी देण्यात आली आहे. यापैकी सुमारे १४० कारखाने प्रत्यक्ष सुरू झाले आहेत.


शेतकरी ३५०० /च्या पहिल्या उचलीच्या प्रतीक्षेत

एकीकडे कारखानदार कमी उताराच्या आर्थिक अडचणीचा हवाला देत सरकारकडे अनुदान मागत आहेत. मात्र शेतकरी याकडे पहिली उचल किती मिळणार याकडे त्यांची लक्ष लागले आहे. स्वाभिमानी शेतकरी, शेतकरी संघटनेच्या वतीने तीन हजार पाचशे रुपयेक्ष दराची मागणी केली असून या मागणीसाठी आंदोलनासारखी भूमिका घेतली आहे. त्यामुळे ऊस दरामुळे कारखानदार व शेतकरी संघटना यांच्यामध्ये संघर्ष निर्माण होण्याची चिन्हे आहेत.

पंढरपूरच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉ. प्रणिताताई भालके यांच्या प्रयत्नांना यश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर शहराच्या सर्व नवीन विकासासाठी सातत्याने प्रयत्नशील असलेल्या पंढरपूर नगरपालिकेच्या लोकनियुक्त नगराध्यक्ष डॉक्टर पंडिता ताई बगीरथ भालके यांच्या विशेष प्रयत्नांना मोठे यश आले असून कार्तिकी यात्रेच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध अनुदनेय विकासासाठी महाराष्ट्र शासनाच्या वतीने पंढरपूर नगरपरिषदेला तब्बल पाच कोटी निधी मंजूर करण्यात आला आहे महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री माननीय एकनाथरावजी शिंदे साहेब यांच्या माध्यमातून तसेच केलेल्या पाठपुरामुळे हा महत्त्वपूर्ण निधी उपलब्ध झाला आहे



राज्य शासनाच्या शासन निर्णय अनुसार राज्यांनी नागरी स्थानिक स्वराज्य संस्था द्यावयाच्या मोटार वाहन कालच्या अधिनियम रक्कम रस्ता अनुदान अनिवार्य या योजनेतून पाच कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

पंढरपूर नगरपरिषद क्षेत्रात कार्तिक यात्रेनिमित्त अनु विकास कामे करण्यात येणार आहेत कार्तिक यात्रेसाठी देशाच्या कानाकोपऱ्यातून लाखो भाविक विठुरायाच्या दर्शनासाठी पंढरपुरात दाखल होत असतात व या पार्श्वभूमीवर शहरातील आवश्यक पायाभूत सुविधा रस्ते तसेच यात्रेशी संबंधित आवश्यक कामांना गती मिळाल्यास या निधीमुळे मोठी मदत होणार असल्याची माहिती नगराध्यक्ष प्रणिता ताई भगरीत भालके यांनी दिली.

पंढरपूर शहर हे महाराष्ट्राचे आराध्य दैवत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची क्षेत्र असल्याने भाविकांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध करून देणे व शहराचा विकास साधने आणि नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांना प्राधान्य देण्यासाठी नागरिकांच्या प्रणिताई बालके आणि सातत्याने प्रयत्नशील आहेत पदभार स्वीकारल्यापासून शहराच्या विकासाच्या दृष्टीने

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेबांच्या माध्यमातून पाच कोटी निधी मंजूर

विविध प्रश्न शासन दरबारी मांडून आवश्यक निधी मिळवण्यासाठी त्यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जात आहे केवळ आश्वासन देते न देता प्रत्यक्ष निधी उपलब्ध करून शहराच्या विकास कामांना चालना देण्याची देण्यावर त्यांचा भर आहे.

कार्तिक यात्रेच्या अनुषंगाने पाच कोटी निधी मंजूर झाल्याने पंढरपूरच्या विकासाला निश्चितच बळ मिळणार असून आगामी काळात शहरातील विकास कामांना अधिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. लोक निवृत्त नगराध्यक्ष डॉक्टर पनीतीताई भालके यांच्या प्रयत्नातून मिळालेल्या या निधी पंढरपूर शहराच्या विकासाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार असून त्यांच्या कार्यततपूर्तीच्या आणि शहराच्या विकासासाठी असलेल्या या सकारात्मक दृष्टीने शरीराच्या दृष्टीने आणखी एक उदाहरण मानले जात आहे.

खालिंग बुद्रुक येथे भव्य किल्ले बनवा स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद; विजेत्यांचा रोख पारितोषिक देऊन गौरव

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

कु. ओमकार गुरुनाथ जाधव यांच्या संकल्पनेतून स्पर्धेचे आयोजन; सहभागी स्पर्धकांनाही प्रोत्साहनपर बक्षीस

ठाणे प्रतिनिधी/ मिलिंद जाधव : दिवाळीच्या निमित्ताने लहान मुला-मुलींच्या कलागुणांना वाव मिळावा, तसेच महाराष्ट्राच्या ऐतिहासिक गडकिल्ल्यांची परंपरा जपली जावी, या उद्देशाने कु. ओमकार गुरुनाथ जाधव (आर. व्ही. लॉजिस्टिक) यांच्या संकल्पनेतून यंदा भव्य किल्ले बनवा स्पर्धेचे आयोजन भिवंडी तालुक्यातील खालिंग बुद्रुक येथे करण्यात आले होते. या स्पर्धेला बालगोपाळांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. चेतन पद्माकर शेलार यांनी पटकावला. त्यांना ५ हजार १ रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. द्वितीय क्रमांक कु. दक्ष महेंद्र शेलार यांनी मिळवला असून त्यांना ३ हजार १ रुपये रोख पारितोषिक देण्यात आले. तृतीय क्रमांक कु. निशांत उमेश शेलार व कु. अंश योगेश शेलार यांनी पटकावला. त्यांना प्रत्येकी २ हजार १ रुपये रोख पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. विशेष म्हणजे, स्पर्धेत सहभाग नोंदविणाऱ्या सर्व स्पर्धकांनाही प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी ५०० रुपये रोख पारितोषिक देण्यात आले.लहान मुलांमधील कला, कल्पकता आणि ऐतिहासिक वारशाविषयी आवड जोपासण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व मोठे आहे. दिवाळीच्या सणात किल्ले उभारण्याची परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे. सदर स्पर्धेचे आयोजन कु. ओमकार गुरुनाथ जाधव (आर. व्ही. लॉजिस्टिक) यांनी केले होते.



कार्तिकी वारीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथे प्रादेशिक परिवहन विभागाकडुन, विशेष रिक्षा तपासणी मोहीम

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

सोलापूर/जिमाका : कार्तिकी वारीच्या अनुषंगाने पंढरपूर येथे येणाऱ्या वारकरी व भाविकांचा प्रवास सुरक्षित, सुकर आणि विनाअडथळा व्हावा, तसेच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी, या उद्देशाने प्रादेशिक परिवहन कार्यालय, सोलापूर यांच्या वतीने दिनांक १३ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पंढरपूर शहरात विशेष रिक्षा तपासणी मोहीम राबविण्यात आली.

या मोहिमेदरम्यान प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या दोन वायुवेग पथकांमार्फत शहरातील एकूण ६१ ऑटोरिक्षांची तपासणी करण्यात आली. तपासणीअंती वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० ऑटोरिक्षांविरुद्ध मोटार वाहन अधिनियमातील तरतुदींनुसार दंडात्मक कारवाई करण्यात आली.

सदर मोहिमेदरम्यान रिक्षाचालकांना प्रवाशांकडून नियमानुसारच भाडे आकारण्याबाबत, गर्दीच्या ठिकाणी वाहन चालविताना विशेष खबरदारी घेण्याबाबत तसेच वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत सूचना देण्यात आल्या. विशेषतः चौपाळा ते छत्रपती शिवाजी महाराज चौक या मार्गावर वारीच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वारकरी व भाविकांची वर्दळ असते. त्यामुळे सदर मार्गावर रिक्षा चालवू नयेत अथवा रिक्षा उभ्या करू नयेत, अशा स्पष्ट सूचना रिक्षाचालकांना देण्यात आल्या आहेत. या सूचनांचे पालन करून वाहतूक कोंडी टाळण्याबाबत चालकांचे प्रबोधन करण्यात आले.

कार्तिकी वारीच्या संपूर्ण कालावधीत अशा प्रकारची विशेष तपासणी मोहीम सुरू ठेवण्यात येणार असून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या तसेच प्रवाशांकडून अवाजवी भाडे आकारणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येणार आहे.

कार्तिकी वारीसाठी पंढरपूर येथे येणाऱ्या सर्व रिक्षाचालकांनी वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे, प्रवाशांकडून नियमानुसार भाडे आकारावे, गर्दीच्या ठिकाणी सुरक्षितपणे वाहन चालवावे, निर्धारित मार्ग व वाहतूक व्यवस्थेचे पालन करावे तसेच वारकरी व भाविकांशी सौजन्यपूर्ण व सहकार्याची भूमिका ठेवावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, विजय पाटील यांनी केले आहे.

मोठ्या भावाची स्वप्नपूर्ती — **महाडिक बंधूचा अनोखा प्रेमभाव**

चक्क...खासदार बसले सरपंचाच्या खुर्चीवर



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर/प्रतिनिधी : राजकारणात पद, प्रतिष्ठा आणि अधिकाराला नात्यापेक्षा अधिक महत्त्व दिले जाते. मात्र, काही व्यक्तींसाठी पदापेक्षाही नाती आणि दिलेला शब्द अधिक महत्त्वाचा असतो. याचाच प्रत्यय पुळूज ग्रामपंचायतीमध्ये एका अनोख्या प्रसंगातून आला. बिनविरोध लोकनियुक्त सरपंचपदी निवड होऊनही केवळ आपल्या खासदार भावाने ग्रामपंचायतीच्या खुर्चीवर बसल्यानंतरच आपण सरपंचपदाच्या खुर्चीवर विराजमान होणार, असा संकल्प सरपंच विश्वास (भैय्या) महाडिक यांनी केला होता. मोठ्या चुलत भावाच्या स्वप्नपूर्तीसाठी भाजपचे खासदार धनंजय महाडिक यांनी पुळूजच्या ग्रामपंचायत मध्ये हजेरी लावत खुर्चीवर विराजमान झाले. दोघा चुलत भावामधील स्नेहभाव समाजाच्या डोळ्यात अंजन घालणारा असाच आहे.

सरपंच विश्वास (भैय्या) महाडिक यांची पुळूज ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त सरपंचपदी बिनविरोध निवड झाली होती. मात्र, निवडीनंतरही त्यांनी सरपंचपदाची खुर्ची स्वीकारण्याबाबत एक वेगळीच भूमिका घेतली होती. 'माझे बंधू खासदार धनंजय महाडिक हे स्वतः पुळूज ग्रामपंचायतीच्या खुर्चीवर बसल्याशिवाय मी सरपंचपदाच्या खुर्चीवर बसणार नाही,' असा शब्द त्यांनी दिला होता. त्यामुळे सरपंचपदाची जबाबदारी मिळूनही त्यांच्या या संकल्पाची परिसरात चर्चा सुरू होती.

अखेर आज खासदार धनंजय महाडिक यांनी पुळूज ग्रामपंचायतीला सदिच्छा भेट दिली. यावेळी त्यांनी ग्राम पंचायतीच्या खुर्चीवर विराजमान होताच सरपंच विश्वास (भैय्या) महाडिक यांनी दिलेल्या शब्दाची पूर्तता झाली. खासदार भावाने ग्रामपंचायतीच्या खुर्चीवर बसल्यानंतरच सरपंचांनीही आपल्या पदाची खुर्ची स्वीकारण्याचा संकल्प पूर्ण केला.

दरम्यान विश्वास महाडिक यांनी कार्यालयातील बाजूच्या खुर्चीवर बसून गावच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यात कुठेही कमतरता भासू दिली नाही.

सामान्यतः सरपंचपद मिळाल्यानंतर पदभार स्वीकारण्यासाठी उत्सुकता असते. मात्र, पुळूजचे सरपंच विश्वास महाडिक यांनी आपल्या खासदार बंधूंच्या भेटीची प्रतीक्षा करत दिलेला शब्द पाळण्याला प्राधान्य दिले. भावंडांमधील जिव्हाळा, परस्पर आदर आणि कौटुंबिक नात्यांमधील भावनिक बंध अधोरेखित करणारा हा प्रसंग ठरला आहे. राजकीय क्षेत्रात अनेकदा पद आणि अधिकारांवरून चर्चा रंगत असताना पुळूजमधील या प्रसंगाने मात्र वेगळेच लक्ष वेधले आहे. एका खुर्चीच्या निमित्ताने भावंडांमधील नाते आणि दिलेल्या शब्दाला जागण्याची भावना ग्रामस्थांसमोर आली. त्यामुळे या अनोख्या प्रसंगाची पुळूजसह परिसरात विशेष चर्चा रंगली आहे.

यावेळी उपसरपंच अमोल बाबर, भारत पाटील, किसन जाधव, पांडुरंग ताटे, अरुण देवकते, महादेव शेंडगे, विनायक पाटील, लिंगादेव शेंडगे, अन्सार शेख, सदाशिव म्हमाने, सचिन बाबर यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत कर्मचारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आंबे विहीर दुर्घटनेतील मृत कामगारांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाखांची मदत

पालकमंत्री जयकुमार गोरे यांची मध्यरात्री घटनास्थळी भेट; बचावकार्याचा घेतला आढावा; दुर्घटनेची उच्चस्तरीय समितीमार्फत सखोल चौकशी करणार; जिल्ह्यातील सर्व विहिरींचे सर्वेक्षण करण्याचे प्रशासनाला निर्देश

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क



पंढरपूर : पंढरपूर तालुक्यातील आंबे येथे विहीर खोदकाम सुरू असताना दगड-मातीचा मोठा ढिगारा कोसळून झालेल्या दुर्घटनेची गंभीर दखल घेत ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी रविवारी म ध्यरात्री एक वाजता घटनास्थळी भेट देऊन बचावकार्याची पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित यंत्रणांकडून शोधकार्याचा सविस्तर आढावा घेतला. दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कामगारांच्या कुटुंबीयांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची मदत देण्याची घोषणा त्यांनी केली.

आंबे येथे विहिरीचे खोदकाम सुरू असताना अचानक दगड-म ातीचा मोठा ढिगारा कोसळल्याने चार कामगार त्याखाली अडकले होते. या दुर्घटनेची माहिती मिळताच जिल्हा प्रशासन, पोलीस यंत्रणा, अग्निशमन दल तसेच संबंधित बचाव पथकांनी घटनास्थळी धाव घेत बचावकार्य सुरू केले. या दुर्घटनेत रांझणी येथील सिद्धेश्वर घाडगे आणि मंगेश मोरे हे दोन कामगार मृतावस्थेत आढळून आले, तर अनवली येथील अन्य दोन कामगार ढिगाऱ्याखाली अडकले होते.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मध्यरात्री घटनास्थळी पोहोचल्यानंतर बचावकार्यातील अडचणी, उप-लब्ध यंत्रणा, शोधकार्याची प्रगती आणि पुढील कार्यवाही याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. तसेच मृत कामगारांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. या कठीण प्रसंगी शासन त्यांच्या पाठीशी असून मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपयांची आर्थिक मदत देण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

विहीर खोदकाम आणि ब्लास्टिंगच्या परवानगीची चौकशी होणार

विहीर खोदकामासाठी आवश्यक प्रशासकीय परवानगी घेण्यात आली होती का, ब्लास्टिंग करण्यास परव-ानगी होती का, तसेच कामगारांच्या सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात आल्या होत्या का, याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. सुरक्षेच्या नियमांचे पालन न करता अशा प्रकारे काम सुरू असेल, तर ती गंभीर बाब आहे. या दुर्घटनेची संपूर्ण चौकशी करून जबाबदारी निश्चित करण्यात येईल, असे पालकमंत्री गोरे यांनी स्पष्ट केले.

सोलापूर जिल्ह्यात सध्या अनेक ठिकाणी विहिरींची कामे सुरू आहेत. यामध्ये परवानगी घेऊन सुरू असलेल्या तसेच विनापरवाना खोदण्यात येणाऱ्या विहिरींची माहिती प्रशासनाने संकलित करावी. सर्व विहीर खोदकामांमध्ये सुरक्षिततेच्या नियमांचे काटेकोर पालन होत आहे की नाही, याची तपासणी करावी, असे निर्देशही त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

दगडांच्या नमुन्यांची तपासणी; ब्लास्टिंगमध्ये वापरलेल्या रसायनांचाही शोध

दरम्यान, जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी दुर्घटनेची समिती स्थापन करून सखोल चौकशी करण्यात येणार असल्याची माहिती दिली. विहिरीतून शोधकार्यादरम्यान बाहेर काढण्यात आलेल्या दगडांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येणार असून, ब्लास्टिंगसाठी कोणत्या प्रकारचे केमिकल किंवा रासायनिक पदार्थ वापरण्यात आले होते, याचाही तपास केला जाणार आहे. त्यामुळे दुर्घटनेमागील नेमकी कारणे स्पष्ट होण्यास मदत होईल, असे त्यांनी सांगितले.

सोलापूर जिल्ह्यातील परव-ानगीप्राप्त आणि विनापरवाना सुरू असलेल्या विहिरींचे सर्वेक्षण करण्यात येणार असून, संबंधित कामांची पर-वानगी आणि सुरक्षा व्यवस्थेची तप-ासणी केली जाईल. आंबे येथील दुर्घटनेनंतर जिल्हा प्रशासनाने या प्रकरणाला प्राधान्य दिले आहे.

दुर्घटनेतील बचाव व शोधकार्यावर लक्ष ठेवण्यासाठी जिल्हाधिकारी एस. कार्तिकेयन यांनी स्वतः बारा तासांहून अधिक काळ घटनास्थळी उपस्थित राहून संबंधित यंत्रणांशी समन्वय साधला. बचावकार्याची प्रगती आणि आवश्यक साधनसामग्रीबाबत त्यांनी सातत्याने आढावा घेतला.

यावेळी माजी आमदार प्रशांत परिचारक, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, प्रांताधिकारी सचिन इथापे, तहसीलदार सचिन लंगुटे, पोलीस निरीक्षक सुरेश चिल्लारवार, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी शक्तीसागर ढोले यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

शिवभक्त प्रतिष्ठान किल्ले बांधणी स्पर्धा पारितोषिक वितरण समारंभ संपन्न





दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : दि शिवभक्त प्रतिष्ठान पंढरपूर यांच्या वतीने गेली २१ वर्षापासून सातत्याने किल्ले बांधणी स्पर्धेचे आयोजन करण्यात येते

या कार्यक्रमाच्या सुरुवातीला छत्रपतींचा इतिहास ज्वलंत व जिवंत ठेवण्याचे काम कौतुकास्पद

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून व ध्येयमंत्र व प्रेरणा मंत्र त्याचबरोबर ललकारी देऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली किल्ले बांधणी स्पर्धा ही दोन गटांमध्ये घेण्यात आली लहान गट व मोठा गट दोन्ही गटाम धून १०१ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला यामध्ये किल्ल्यांची प्रतिकृती त्याचबरोबर काल्पनिक असे किल्ले बनवण्यात आले

लहान गटामध्ये प्रथम क्रम ांक अथर्व कुंभार(पद्मदुर्ग) द्वितीय क्रमांक श्रेयस शिंगाडे (तोरणा गड) तृतीय क्रमांक राघव कुलकर्णी (सज्जनगड) उत्तेजनार्थ पार्थ शहापूरकर (सिंहगड) समर्थ कुंभार (पन्हाळा) विशेष सन्म ानार्थ सुनित कटप (शिवनेरी) विशेष सन्मानार्थ योगेश बहिरवडे (विजयदुर्ग)

मोठा गट प्रथम क्रमांक अष्टविनायक ग्रुप (सिंहगड र) द्वितीय क्रमांक दुर्वांकुर देणारे (राजगड) तृतीय क्रमांक शिवबा राजे मित्र मंडळ (तोरणा) उत्तेजनार्थ त्रिमूर्ती तरुण मंडळ (प्रतापगड) उत्-ेजनार्थ समस्त जुनी पेठ तालीम मित्र मंडळ (रायगड) विशेष सन्मानार्थ वरद बडवे (राजगड) विशेष सन्मानार्थ पुंडलिक सेवा मित्र मंडळ (राजगड) विशेष सन्मानार्थ ऐश्वर्या कुलकर्णी (मल्हारगड) विशेष सन्मानार्थ सोहम हरहरे (जंजिरा) विशेष सन्मानार्थ अभिषेक कुलकर्णी (रत्नदुर्ग) महेश तमखाने (प्रतापगड) याप्रम ाणे पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला.

या स्पर्धेमध्ये विजेत्यांना मानाचा फेटा, सन्मान चिन्ह व प्रमाणपत्र तसेच सर्व स्पर्धकांना सहभाग प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले हा कार्यक्रम जाधव जी जेठाबाई धर्मशाळा स्टेशन रोड पंढरपूर येथे पार पडला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिवभक्त यांनी विशेष सहकार्य घेतले.

यामध्ये काही स्पर्धकांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्तिकी यात्रा २०२६ : अन्नछत्र सेवेसाठी श्री अर्जुन पिंगळे यांच्याकडून चार लाख रुपये किमतीचे साहित्य देणगी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : श्री क्षेत्र पंढरपूर येथे सुरू असलेल्या कार्तिकी यात्रा २०२६ च्या पार्श्वभूमीवर भाविकांना अन्नछत्राच्या माध्यम ातून भोजनसेवा उपलब्ध करून देण्यासाठी बीड येथील श्री अर्जुन हनुमंत पिंगळे यांनी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समिती, पंढरपूर यांना चार लाख रुपये किमतीचे साहित्य देणगी स्वरूपात उप-लब्ध करून दिले आहे.

यात्रा कालावधीत पंढरपूर येथे येणाऱ्या भाविकांना अन्नछत्राच्या माध्यमातून भोजन-सेवा देण्यासाठी या देणगीचा मोलाचा उपयोग होणार आहे. सामाजिक बांधिलकी व विठ्ठलभक्तीच्या भावनेतून दिलेल्या या योगदानाबद्दल श्री अर्जुन हनुमंत पिं-गळे यांचा मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी श्री. श्रीकांत यादव यांच्या हस्ते यथोचित सन्मान करण्यात आला. त्याप्रसंगी लेखाधिकारी मुकेश अनेचा उपस्थित होते,

मंदिर समितीच्या वती-ने त्यांच्या या सेवाभावी



योगदानाबद्दल आभार व्यक्त करण्यात आले.

लामजना परिसरात पाण्याअभावी उभ्या ऊसाचे पाचट; ऊस उत्पादक शेतकरी हवालदिल



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

औसा प्रतिनिधी/अमर जाधव : ऊस गाळप कारखाने ऊस घेऊन जात नसल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट; लाखोंच्या उत्पादनावर पाणी फिरण्याची शेतकऱ्यांना भीती....

लामजना, ता. औसा : लामजना व परिसरातील गावांमध्ये पाण्याअभावी उभ्या उसाचे मोठ्या प्रमाणात पाचट होत असल्याने ऊस उत्प-ादक शेतकरी हवालदिल झाले आहेत. दरवर्षी लाखो रुपयांचे उत्पन्न मिळवून देणारे ऊस पीक यंदा मात्र पाणीटंचाईच्या विळख्यात सापडले आहे.औसा तालुक्यासह

परिसरात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्याने उसाला पुरेसे पाणी मिळत नसून शेतकऱ्याचा उभा ऊस वाळू लागला आहे. गेल्या ६ महिन्यापासून पावसाची उघडीप असल्याने पाण्याअभावी उसाची वाढ खुंटली असून अनेक ठिकाणी ऊस पिकाचे पाचट होत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यातच वाळलेल्या उसाला साखर कारखाने घेऊन जाण्यास तयार नसल्याने शेतकऱ्यांची मोठी कोंडी झाली आहे.

औसा तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी सावकारी व बँकेचे कर्ज काढून आपल्या शेतात ऊस लागवड केली होती. दुष्काळात तेरावा महिना त्यात पावसाने उघडीप दिल्याने. शेतकऱ्यांच्या विहीर व बोरवेल ला पाणी कमी झाल्याने व पाण्यावचून वाळत चाललेला ऊस शेतात उभा वाळून जात असल्याने त्याचे पाचट होत असल्याने शेतकरी पुरताच हवालदिल झाला आहे.

एकीकडे ऊस लागवड वा पिकासाठी केलेला लाखोंचा खर्च आणि दुसरीकडे हातातोंडाशी आलेले पीक डोळ्यादेखत वाळत असल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या या गंभीर प्रश्नाकडे संबंधित साखर कारखाने आणि प्रशासनाने लक्ष देऊन तातडीने म ार्ग काढावा, अशी मागणी औसा तालुक्यातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

आरोपींकडून ५५,००,००० रुपये किमतीचे एकूण ३९८,५१० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने केली जप्त



पंढरपूर शहर पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे मोठी कामगिरी

दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

पंढरपूर : पंढरपूर शहर पोलीस ठाणे गु.रा.न.६८७/२०२६भा. न्या.स.२०२३ चे कलम ३ ९ ६ (४) ३ ९ ८ (३) दिनांक०५/११/२०२६ गुन्हा दाखल, झाला असून सदर गुन्ह्यातील फिर्यादींच्या ओळ-खीचा सिद्धी ज्वेलर्स मध्ये काम ास असणारा आरोपी नामे कादर रमजान मुलांनी रा. मांजरी, तालुका सांगोला, जिल्हा सोल-ापूर, हा दिनांक २६ /१० २०२६ रोजी रात्री २०.००वा.चे दरम्यान फिर्यादीची दुकानात येऊन फ ेरारी नामे एस के अश्रफुल हक व्यवसाय सुवर्ण कारागीर,(अरीम प्पा गोल्ड) पंढरपूर यांना सिद्धी ज्वेलर्स चे मालक रमेश शिंदे राहणार वाखरी तालुका पंढरपूर यांच्या दुकानात ग्राहकांना दागिने दाखवण्याकरता दागिने मागितले आहेत. असे सांगून खोटे बोलून एकूण३९८.५१० ग्रॅम वजनाची दहा नग सोन्याचे गंठण घेऊन गेला. ते दागिने सिद्धी ज्वेलर्स च्या दुकानात घेऊन न जाता, व फिर्यादीस परत न आणून देता, हिरादीस खोटे बोलून फसवणुकीच्या करण्याच्या उद्देशाने स्वतःच्या फायद्या करता परस्पर घेऊन गेला होता. या वरील प्रमाणे पंढरपूर शहर पो-लीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.

पंढरपूर शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री महेश ढवान यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार पंढरपूर शहर गुन्हे प्रकटीकरण शाख-ेचे विभागातील तपास पथके तयार करून तपास केला असता तांत्रिक बाबीची विश्लेषण करून तसेच गोपनीय बातमी दाराकडून बातमी मिळाल्यास माहितीच्या आधारे कौशल्यपूर्ण तपास करून आरोपीचा शोध घेऊन सदर होण्याची उकल केली आहे. यातील आरोपी कादर रमजान मुलांनी हा दिनांक १९/ १० २०२६ आरोपी मिळून आल्यास त्या गुन्ह्याची उकल करून १६ ११ /२०२६ पोलीस कशासाठी रिमांड मंजूर करून घेतले आहे. पोलीस कस्टडी डिमांड आरोपीकडे वारंवार तपास केला असता तो सोन्याच्या दागिने बाबत काही माहिती सांगत नव्हता. आरोपीस अधिक विश्वासात घेऊन सोन्याच्या दागिने त्या तपास केला असता त्यांनी पुण्यातील घेऊन गेलेल्या दागिने ची माहिती सांगून सोन्याची दागिने काढून दिले आहेत. त्याप्रमाणे पोलिसांनी आरोपीकडून५५,००,०००/ रुपये किमतीचे३९८.५१० ग्राम वजनाची दहा गंठण त्यातील एका सोन्याची पदक असलेले पुण्यातील घेऊन गेलेला म** जप्त केला आहे.

सदरची कामगिरी मा. पो-लीस अधीक्षक सोलापूर अतुल कुलकर्णी, मा. अप्पर पोलीस अधीक्षक, प्रेरणा कट्टे मॅडम, उपविभागीय पोलिस अधिकारी सिताराम डुबल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक पंढरपूर शहर पो-लीस ठाणे महेश ढवान यांच्या मार्गदर्शनाखाली कडील गुन्हे प्रकटीकरण शाखेचे,हा.फो. सुजितउबाळे,पहवा२४७/अनिल बनसोडे ,पो.ह.वा.९४१३/ असलम काझी,पो.ह.वा. ८०५,गणेश पवार/ पो.ह.वा.१५८३ बापूस-ाहेब मोरे,पो.ह.वा.१७८, सु-नील मोरे,पो.हा.१७८९, सचिन हेंबाडे,पो.को. १२४०,हर्षद ठाकर,१२१६, शाही मंडले,पो. को.१३०४ नवले, तसेच सायबर पोलीस ठाणे सोलापूर पो. को.१८८७, प्रवीण मेटकरी यांनी केले आहे पुढील तपास पो.हा. कॉन्स्टेबल बापूसाहेब मिटकरी करीत आहे.